SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./ Nc 1471 / दि. 11 SEP 2026

# परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :- सन २०२७-२८ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन प्रस्ताव सादर करणेबाबत...**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सन २०२७-२८ या शैक्षणिक वर्षासाठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र शासन मान्यतेच्या अंतरावर New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणाली मार्फत विस्तारीकरणाअंतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम, नवीन विषय, नवीन विद्याशाखा, नवीन अतिरिक्त तुकडी इ. सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव https://htedu.Maharashtra.gov.in/ncps या लिंकव्दारे स्वीकारले जातील. तसेच नवीन सॅटेलाईट केंद्र सुरु करणे, संशोधन संस्था मान्यता, खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता, परिसंस्था सुरु करणे, पीएच.डी. प्रयोगशाळा मान्यता, महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबत व महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करणेबाबतचे प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीने स्वीकारले जाणार आहेत.

त्याअनुषंगाने सदरचे प्रस्ताव मागविण्यासाठीची कार्यपध्दती www.unishivaji.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावरील Affiliation → Affiliation T-2 Circular / Information Lists मध्ये उपलब्ध आहे.

तेव्हा सदर कार्यपध्दतीनुसार आपण प्रस्ताव सादर करावेत. ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

श्री दिपक द. अडगळे
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## जाहिरात

सन २०२७-२८ या शैक्षणिक वर्षासाठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र शासन मान्यतेच्या अंतरावर New College Permission System (NCPS) या **ऑनलाईन प्रणाली मार्फत** विस्तारीकरणाअंतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम, नवीन विषय, नवीन विद्याशाखा, नवीन अतिरिक्त तुकडी इ. सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव https://htedu.Maharashtra.gov.in/ncps या लिंकव्दारे स्वीकारले जातील. तसेच नवीन सॅटेलाईट केंद्र सुरु करणे, संशोधन संस्था मान्यता, खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता, परिसंस्था सुरु करणे, पीएच.डी. प्रयोगशाळा मान्यता, महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबत व महाविद्यालयाच्या / परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करणेबाबतचे प्रस्ताव **ऑफलाईन पध्दतीने** स्वीकारले जातील.

सदर प्रस्ताव बाबतची माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation→AffiliationT-२ Information/Lists या लिंकवर विस्तृत जाहिरात, माहितीपत्रक, शासन निर्णय ठेवण्यात आली आहे व त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिता सादर करावयाच्या विविध शैक्षणिक प्रस्तावांसाठीची वार्षिक योजना शासन मान्यतेच्या अधिन आहे. मात्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (क) मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्था, संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था यांनी दि.३०/०९/२०२६ रोजी पर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) विद्यापीठ कार्यालयीन वेळेत प्रस्ताव व शुल्क सादर करणे आवश्यक आहे.

तसेच भारतीय विधिज्ञ परिषदेने दि.०५.०३.२०२६ रोजीच्या नोटीफीकेशन व्दारे ०३ वर्षाचा मोराटोरिअमचा कालावधी रद्द केलेला आहे. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या विधी महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम, नवीन अतिरिक्त तुकडी या संदर्भातील विस्तारीकरणाअंतर्गत दि.१८.०९.२०२५ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार NCPS या ऑनलाईन प्रणालीव्दारे प्रस्ताव सादर करावेत.

तसेच, सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालया-मध्ये स्वतंत्र विद्याशाखा, नवीन अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी, याबाबतचे प्रस्ताव कायम विनाअनुदानित तत्वावर **ऑनलाईन पध्दतीने** सादर करावेत.

प्रथम शुल्क बँकेत जमा करुन प्रस्ताव दि.३०/०९/२०२६ नंतर सादर करता येणार नाही. शुल्क व प्रस्ताव एकत्र व एकाचवेळी या कार्यालयास दि.३०/०९/२०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव तसेच विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क यावर कार्यवाही केली जाणार नाही.

**टिप :- शैक्षणिक वर्ष २०२७-२८ या वार्षिक योजनेकरिता शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नवीन महाविद्यालयाच्या प्रस्तावाबाबत आपणास यथावकाश कळविण्यात येईल.**

**सही/-**

क्र.शिवाजीवि/संलग्नता/टी-२/ **डॉ. व्ही. एन. शिंदे**

दिनांक : ११/०९/२०२६ **कुलसचिव**